# कृषि महाविद्यालय
# परभणी

## <u>अल्प मुदतीची जाहीर निविदा सुचना</u>

मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे दिनांक 22 फेब्रूवारी, 2013 रोजी 19वा दिक्षांत समारंभ आयोजीत करण्यात येणार आहे. 250 ते 300 अति विशिष्ट व्यक्तींची भोजन व्यवस्था, अल्पोपहार तसेच सर्व विद्या शाखांच्या सुमारे 4000 विद्यार्थ्यांना अल्पोपहाराची व्यवस्था करण्यासाठी शासकीय परवानाधारक व अनुभवी पुरवठाधारकाकडून (कॉटरर्स) अल्प मुदतीची निविदा मागविण्यात येत आहे. निविदा प्रपत्र सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य तथा अध्यक्ष, भोजन समिती, कृषि महाविद्यालय, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचे कार्यालयात दिनांक 5.2.2013 ते 11.2.2013 या कालावधीत सुट्टीचे दिवस वगळता कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. निविदा प्रपत्राची किंमत रुपये 500/- असुन, सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य तथा अध्यक्ष, भोजन समिती, कृषि महाविद्यालय, परभणी यांचे कार्यालयात रोख जमा केल्यावर कोरी निविदा पुरवीली जाईल. भरलेली मोहरबंद निविदा दिनांक 11.2.2013 रोजी 13.00 वाजेपर्यंत सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य तथा अध्यक्ष, भोजन समिती, कृषि महाविद्यालय, परभणी यांच्या कार्यालयात स्विकारल्या जातील व शक्य झाल्यास त्याच दिवशी दुपारी 15.00 वाजता उघडण्यात येतील. अल्पोपहाराचा नमुना, पॅकींग मटेरीयल आणि पाकीटाच्या आत देण्यात येणा-या अल्पोपहाराच्या पदार्थांचा नमुना दिनांक 11.2.2013 रोजी सोबत असणे आवश्यक आहे.

निविदा सुचना बाबत सविस्तर माहिती विद्यापीठाच्या www.mkv.ac.in किंवा www.mkv2.mah.nic.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

स्वाक्षरीत/-
सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य तथा
अध्यक्ष
भोजन व्यवस्था समिती

## 19वा दिक्षांत समारंभ 2013 च्या भोजन व्यवस्था व अल्पोपहाराचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र

### नाष्टा मेनु

| अ.क्र. | नाष्टा मेनु |
|---|---|
| 1. | पोहे/शिरा/उपमा व चहा |

### दुपारचे जेवण

| अ.क्र. | भोजनाचा मेनु |
|---|---|
| 1. | पालक पनीर, भरवा बैंगन, दाल फ्राय, कट मिरची भजे, पराठा, जिरा राईस, गुलाब जामुन, काजु कतली, तळलेले पापड, ठेचा, शेंगदाना चटनी, सलाद, लोणचे, आईस्क्रीम, बिसलरी पाण्याची बाटली |

### विद्यार्थ्यांसाठी अल्पोपहाराचा मेनु

| अ.क्र. | अल्पोपहाराचा मेनु |
|---|---|
| 1. | 100 ग्रॅम फरसान (उत्तम प्रतीचा) |
| 2. | दोन सोनपापडी (हल्दीरामची सोन पापडी) |
| 3. | पाणी पाउच |
| 4. | ॲल्युमिनीयम फॉइलचे पॅकींग मटेरीयल |
| 5. | छोटा प्लास्टीक चमचा |

टीप :

1. दिक्षांत समारंभाची तारीख लवकरच कळविण्यात येईल.
2. जेवण व्यवस्थेतील सर्व पदार्थ अमर्यादीत स्वरुपात पुरवावे लागतील.
3. जेवणासाठी गोड पदार्थ हे शुध्द तुपामध्ये व इतर पदार्थ हे भुईमुगाच्या खाद्यातेलामध्ये तयार करावे लागतील.
4. खाद्यपदार्थ रुचकर व स्वादिष्ट असावेत आणि ते तयार करताना उत्तम प्रतिचे सामान वापरावे.
5. खाद्य पदार्थ वाढण्यासाठी स्वच्छ गणवेश घातलेले नोकर असावेत.
6. जेवण व्यवस्थेसाठी लागणारे मंडप, बुफे, टेबल, खुर्ची, त्यावरील स्वच्छ चादर, फुलांची सजावट, भोजन कक्षाची सजावट इत्यादीची व्यवस्था कंत्राटदारास करावी लागेल.
7. स्वयंपाकासाठी व जेवणासाठी मंडपाची व्यवस्था कंत्राटदारास करावी लागेल.
8. जेवणासाठी बिसलरी बॉटल पाणी पुरवठा करावा लागेल.

# निविदेच्या अटी व शर्ती

1. कंत्राटदारास सर्व खाद्य व पेय पदार्थ उत्कृष्ट, आरोग्यवर्धक व चांगल्या मालापासून निर्मीत करणे अनिवार्य आहे.
2. सदर खाद्य व पेय पदार्थाचे सेवन केल्याने आरोग्याचा कुठलाही धोका अथवा हानी पोहोचल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील.
3. सुयोग्य सेवा मिळण्यासाठी सर्व्हीसींग काऊंटरवर मितभाषी, योग्य वर्तन व विनम्र सेवकांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.
4. सेवकांची वेशभूषा व हाताची नखे सुयोग्य असणे आवश्यक आहे.
5. कंत्राटदाराने खाद्य व पेय पदार्थ निर्मीतीकरीता आवश्यक असणारे सिलिंडर व तत्सम ज्वालाग्रही साहित्याची योग्य निगा ठेवावी. कोणत्याही विस्फोटक पदार्थाची हाताळणी व उपयोग करतांना कुठलीही दुखापत विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील.
6. खाद्य व पेय पदार्थ निर्मितीकरीता वापरात येणारे सर्व साहित्य स्वच्छ असावेत, जेवणाच्या वेळेस व नाष्टयाच्या वेळेस पुरविण्यात येणारे पिण्याचे पाणी (बिसलरी वॉटर/मिनरल वॉटर) द्यावे लागेल.
7. ज्या फर्मने यापूर्वी अशा अथवा यापेक्षा मोठया जेवणाच्या कार्यक्रमाचे आयोजन यशस्विरित्या केले असल्यास त्या फर्मने आपले अनुभव प्रमाणपत्र द्यावे. अशा निविदाधारकांना प्राधान्य देण्यात येईल.
8. दिनांक 22.2.2013 रोजी खाद्यपान सेवा, परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.
9. कंत्राटदारास प्रत्येक मंडपामध्ये खानपान सेवा पुरविण्याकरीता आवश्यक संख्येत काउंटर्स दिलेल्या निर्देशाप्रमाणे ठेवणे आवश्यक राहील. सदर सेवा सुयोग्यरीत्या देण्याकरीता आवश्यक संख्येने सेवक पुरवावे लागतील.
10. इच्छुक कंत्राटदारांनी निविदा भरण्यापुर्वी प्रत्यक्ष कार्यस्थळाची पाहणी करावी कामाचे स्वरुप समजावुन घेणे अपेक्षित आहे.
11. सर्व सामान चांगल्या प्रतीचे व देण्यात येणा-या निर्देशाप्रमाणे असावेत.
12. कामगार कायद्याप्रमाणे सर्व नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.
13. नियमाप्रमाणे सेवाकर इत्यादी कर भरावे लागतील.
14. सर्व तयार खाद्य पदार्थाची विद्यापीठाने प्राधिकृत केलेल्या खाद्य समितीव्दारे जेवणापुर्वी चव तपासणी करण्यात येईल.
15. अल्पोपहार व जेवण आदी विहीत स्थळी मुले/मुली/अधिकारी यांना स्वतंत्ररीत्या पुरवावे लागतील.
16. सदरील कराम पुढील तीन महिन्यासाठी असेल.
17. निर्देशाप्रमाणे भोजन आदीची चव व व्यवस्थेबाबत तक्रारी/त्रुटी आढळल्यास योग्य तो दंड आकारण्यात येईल व तो देणे पुरवठाधारकास बंधनकारक राहील.

18. अनामत रक्कम रुपये 5,000/- (रु.पाच हजार केवळ) चा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट नियंत्रक, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी या नावाने देण्यात यावा तो न जोडल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही.
19. यशस्वी निविदाधारकास सुरक्षा ठेव म्हणून रुपये 25,000/- (रु.पंचवीस हजार केवळ) विद्यापीठात जमा करावे लागतील.
20. को-या निविदा दिनांक 5.2.2013 ते 11.2.2013 पर्यंत कार्यालयीन वेळेत विकल्या जातील व भरलेल्या निविदा दिनांक11.2.2013 रोजी दुपारी 13.00 वाजेपर्यंत स्विकारल्या जातील. शक्य असल्यास त्याच दिवशी दुपारी 15.30 वाजता सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य तथा अध्यक्ष, भोजन समिती, कृषि महाविद्यालय, परभणी यांच्या दालनात उघडल्या जातील.
21. निविदा स्विकारणे/उघडणे बाबतच्या तारखा बद्दल विद्यापीठ प्रशासनाचा निर्णय अंतीम राहील.
22. कोणतीही निविदा मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.
23. सदरील निविदे संबंधीत काही वाद निर्माण झाल्यास ते परभणी न्यायालया अंतर्गत (Subject to Parbhani jurisdiction) राहुनच सोडविण्यात येतील.
24. पुरवठाधारकास रुपये 100/- च्या बाँडवर करारनामा करुन द्यावा लागेल.
25. निविदाधारकास खालीलप्रमाणे दोन सीलबंद पाकीटामध्ये निविदा सादर करावी लागेल.

पाकीट क्रं.1 वर **पाकीट क्र.1** असे स्पष्ट नमुद केलेले असावे व त्यात खालील कागदपत्रे द्यावीत.

1. इसारा (ईएमडी) रुपये 5,000/- रकमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट.
2. शॉपॲक्ट अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र.
3. विक्रीकर नोंदणी प्रमाणपत्र.
4. अन्न व औषधी विभागाचे खाद्यान्न विक्रीचे प्रमाणपत्र.
5. अनुभव प्रमाणपत्र

पाकीट क्रं.2 वर **पाकीट क्रं.2** असे लिहुन त्यावर अल्पोपहार व भोजन व्यवस्थेची निविदा असे स्पष्टपणे नमुद केलेले असावे व त्यात फक्त भरलेली निविदा असावी. निविदाधारकाने आपले दर आवश्यक त्या ठिकाणी अंकात व अक्षरी लिहावे.

उपरोक्त पाकीट क्रं.1 आणि पाकीट क्रं.2 ही दोन्ही पाकीटे, मोठया पाकीटात टाकून मोहरबंद करुन त्यावर ठेकेदाराचे नांव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक स्पष्टपणे लिहुन सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य तथा अध्यक्ष, भोजन समिती, कृषि महाविद्यालय, परभणी यांचेकडे सादर करावे.

26. नाष्टा, भोजन व अल्पोपहारासाठी व्यक्तीची संख्या कमी-अधिक होऊ शकते.